# जिल्हा परिषद भंडारा

## माहीतीचा अधिकार अधिनियम - २००५

## १७ मुद्याचे मॅन्युअल

## सन २०२४-२०२५

# माहीतीचा अधिकार अधिनियम- २००५

(केन्द्र शासनाच्या अधिनियमातील तरतुदीनुसार दि. १२.१०.२००५ पासुन अंमलबजावणीबाबत)

## सातवी आवृत्ती

सन - २०२४-२५

* परिकल्पनात्मक मार्गदर्शन व सल्ला *

**मा.श्री विवेक इलमे**

उप आयुक्त (आस्थापना)

**मा.विवेक इलमे**

उप आयुक्त (विकास)

मा. विभागीय आयुक्तांचे कार्यालय,

नागपुर विभाग, नागपुर

** निर्देश व मार्गदर्शन **

**श्री एस.एम.कुर्तकोटी**

मुख्य कार्यकारी अधिकारी,

जिल्हा परिषद , भंडारा

**जे.ए.परब ,**

उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य)

जिल्हा परिषद भंडारा

*** संकलन व संयोजन ***

**श्री एम.बी.तेलमासरे**

अधिक्षक

सामान्य प्रशासन विभाग,

जिल्हा परिषद भंडारा

श्री प्रमोद भ.मानकर ,

वरिष्ठ सहाय्यक

सामान्य प्रशासन विभाग

जिल्हा परिषद भंडारा

तांत्रीकी सल्लागार

श्री संदिप लोखंडे , जिल्हा एनआयसी

**** विशेष सहाय्यक ****

खाते प्रमुख व पंचायत समिती येथील सर्व कक्ष अधिकारी व अधिक्षक

जिल्हा परिषद भंडारा

**एस.एम.कुर्तकोटी ,**
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, भंडारा

## प्रस्तावना

भंडारा जिल्हा हा १८१८ ते १८४० पर्यंत परगणे शासना अंतर्गत १८५८ मध्ये ब्रिटीश राजवटीत समाविष्ट झालेला आहे. १८२० मध्ये या जिल्हयाचे मुख्यालय लांजीवरुन भंडारा येथे आणण्यात आले.

भंडारा जिल्हयाचे क्षेत्रफळ ३७१६.६५ चौरस कि.मी.असून भौगोलिक क्षेत्रफळ ३,८९,००० हेक्टर आहे. सरासरी पर्जन्य १३३०.२० मी.मी.असून २०११ च्या जनगणने नुसार लोक संख्या १२,००,३३४ एवढी आहे. जिल्हयाचे उत्तरेला मध्य प्रदेशातील बालाघाट, छिंदवाडा जिल्हा आणि पुर्वेला गोंदिया जिल्हा आहे. महाराष्टातील नागपूर व चंद्रपूर जिल्हे अनुक्रमे पश्चिम व दक्षिण दिशेला आहेत. वैनंगगा व बानथडी नदयांनी जिल्हयाच्या उत्तरे ची सिमा व्यापलेली असून मुंबई, कोलकाता या राष्ट्रीय महामार्ग क्रं.६ वर भंडारा शहर जिल्हयाचे मुख्यालय आहे.

जिल्हयांत सातपुडा पर्वताच्या शाखातील आंबागड डोंगराची रांग पश्चिम व पूर्व जिल्हयांच्या आग्नेय भागात असून जिल्हयाच्या मध्य भागात भंडारा शहरा पासून गोंदिया पर्यंत गायमुखी डोंगराची रांग आहे. यातील खर्डा पाहाडी २००९ फूट लेंडेझरी १४९० फूट उंच आहे. हया जिल्हयात आंबागड, पवनी, सानगडी येथील किल्ले आजही परगणा प्रशासनाची साक्ष देतात. गायमुख, कोरंबी, चांदपूर (तुमसर) व नांदोरा, झिरी ही जिल्हयातील प्रेक्षणिय स्थळे असून हा जिल्हा नैसर्गिक दृष्टया देखील प्रेक्षणिय समजला जातो. हया जिल्हयात लहान मोठी २००० पेक्षा जास्त तलाव असून जिल्हयाला तलावाचा जिल्हा म्हणून भौगोलिक दृष्टया महत्व प्राप्त झाले आहे. या तलावापासून शेतीला ओलीताची सोय केली जाते व पूरक उत्पन्न म्हणून मत्स्योत्पादनही करण्यात येते. हया जिल्हयात एकूण ७७४ महसूली गावात ३८१स्वतंत्र ग्रामपंचायती व १६० गट ग्रामपंचायती अशा एकूण ५४१ ग्रामपंचायती यात समाविष्ठ आहेत.सदर ग्राम पंचायती मार्फत ग्रामीण स्तरावर प्रशासकीय व विकासाची कामे केली जातात.

**(एस.एम.कुर्तकोटी,)**
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, भंडारा

**श्री गंगाधर मुकुंदाजी जिभकाटे**
अध्यक्ष,
जिल्हा परिषद, भंडारा

## अभिप्राय

शासकीय कामकाजाची संपुर्ण माहिती सदरहू माहितीच्या अधिकाराच्या कायद्यामुळे सर्वसाधारण नागरीकांना अवगत होण्यासाठी तथा शासकीय कामात पारदर्शकता राहण्यासाठी केंद्र शासनाने दिनांक १२.१०.२००५ रोजी संपुर्ण देशात माहितीचा अधिकार अधिनियम-2005 लागू केलेला आहे. माहितीचा अधिकार कायदा हा नागरिकाभिमुख कायदा असल्यामुळे पारदर्शकता ,उत्तरदायित्व व लोकसहभाग याचा त्रिवेणी संगम या कायद्यात आढळतो. मी हया कायद्याची कितीही प्रसंशा केली तरी ती तोकडी पडेल. त्याबददल मी केंद्र शासनाचा आभारी आहे.

तसेच माहितीचा अधिकार सर्वसाधारण नागरीकांना निश्चीतच लाभदायक ठरणार आहे. त्यामुळे जिल्हा परिषद भंडारा यांनी प्रकाशीत केलेल्या १७ मुदयावरील माहितीचा योग्य उपयोग करुन घ्यावा असे सर्व नागरीकांना माझे आवाहन आहे. तसेच प्रसिध्द करण्यात आलेल्या माहितीसाठी मी , मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद भंडारा तथा त्यांना सहाय्य करणाऱ्या जिल्हा परिषद च्या सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे अभिनंदन करतो.

आपला स्नेहांकित

**(श्री गंगाधर मुकुंदाजी जिभकाटे )**
**अध्यक्ष**
**जिल्हा परिषद, भंडारा**

जयप्रकाश परब
उपमुख्य कार्यकारी अधिकारी
(सामान्य)
जिल्हा परिषद, भंडारा

## मनोगत

केंद्र शासनाने माहितीचा अधिकार २००५ हा अधिनियम दि.१२ ऑक्टोबर ०५ रोजी संपूर्ण देशभरात लागू केलेला आहे. या अधिनियमानुसार जिल्हा परिषद अंतर्गत चालविलेल्या कामकाजाची माहिती सर्व सामान्य जनतेस उपलब्ध करुन देण्यासाठी माहिती अधिकार नियम २००५ चे नियम ४ (क) (ख) अन्वये माहिती ची पुस्तीका भाग एक व दोन प्रसिध्द करण्यांत येत आहे. तरी सर्व नागरीकांनी माहिती पुस्तीकेचा आवश्यक माहितीसाठी योग्य उपयोग करावा.

धन्यवाद !

आपला नम्र ,

(जयप्रकाश परब)
उपमुख्य कार्यकारी अधिकारी,
(सामान्य)
जिल्हा परिषद, भंडारा